**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

## लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक २९.०६.२०२२
## इतिवृत्त क्रमांक — २८

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक २९.०६.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.



Scanned with CamScanner

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११

(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४

(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

**विषय क्र.०१ - नव्याने प्राप्त झालेले प्रकरणे**

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १ | **श्रीम. कामिनी प्रमोद भालेराव**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. जितेश प्रमोद भालेराव**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. जितेश प्रमोद भालेराव, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २ | **श्री.सुरेश मुरलीधर सोनवणे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.शुभम सुरेश सोनवणे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.शुभम सुरेश सोनवणे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ३ | **श्री.संजय नामदेव ताठे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. रोहीत संजय ताठे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. रोहीत संजय ताठे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४ | **कै.विनोद यशवंत बोरीचा**<br>मयत सफाई कामगार | **श्रीम. वैशाली विनोद बोरीचा**<br>(पत्नी) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (१) या तरतुदीनुसार 'पत्नी' या नात्याने **श्रीम.वैशाली विनोद बोरीचा, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ५ | **कै.विजय जबाजी गवारे**<br>मयत सफाई कामगार | **श्री. अथर्व विजय गवारे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. अथर्व विजय गवारे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन )<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (मनोज घोडे पाटील )<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ६ | **श्रीम. निता जितेंद्र परामार**<br>स्वेच्छानिवृत्त स्वच्छता मुकादम | **श्री.पियुष जितेंद्र परमार**<br>(मुलगा) | श्री. पियुष जितेंद्र परमार यांनी लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार शैक्षणिक अर्हतेनुसार स्वच्छता निरीक्षक या पदावर नोकरी मिळणेस अर्जात नमुद केले आहे. नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम अन्वये महापालिकेने प्रस्तावीत केलेली स्वच्छता निरिक्षक या पदाच्या नामनिर्देशन नेमणुकीकरीता अर्हता पुढील प्रमाणे –<br>(अ) माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व स्वच्छता निरिक्षक पदविका उतीर्ण<br>(ब) संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>(क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधन्य<br><br>स्वच्छता निरिक्षक या पदाची नमुद अर्हता बघता श्री. पियुष जितेंद्र परमार यांनी (१) १२ वी उत्तीर्ण (२) स्वच्छता निरिक्षक डिप्लोमा कोर्स उत्तीर्ण असलेबाबत शैक्षणिक अर्हता धारण केली असल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा. अनुभवाबाबत श्री.परमार यांनी कोणतेही दस्त सादर केलेले नाही.<br>तथापि, स्वच्छता निरिक्षक पदाची अनुभव अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवाराबाबत नाशिक मनपा सामान्य प्रशासन विभाग मार्फत अनुकंपा नियुक्ती योजने अंतर्गत स्वच्छता निरिक्षक पदावर नेमणुक देतांना नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती क्रमांक १ नुसार स्वच्छता निरिक्षक पदासाठी अनुभवाची अट शिथिल करुन नेमणुक देण्यात आल्याचे निदर्शनास आलेली आहे.<br><br>**वरील परिच्छेदातील अनुभवाच्या संदर्भातील बाबीचा प्रामुख्याने विचार करता व लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत - महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६-ब(सी), दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रकात खालीलप्रमाणे सुचना नमुद आहेत.**<br>२ अ) लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवर मेहतर व वाल्मीकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करतांना त्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते व ते यापुढेही चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास सेवाप्रवेशातील नियम शिथिल करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.<br>२ ब) सफाईगार कर्मचाऱ्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास नोकरी देताना शासकीय/निमशासकीय कार्यालयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील जेष्ठता यादीतील केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांची नेमणुक करण्यात येईल,यासंबंधी विशेष खबरदारी घेण्यात यावी.<br>**उपरोक्त शासन परिपत्रकातील नमुद सुचनेप्रमाणे सेवाप्रवेशातील नियम शिथिल करणेबाबतचा निर्णय घेणेस मा.नियुक्ती प्राधिकरण यांना अधिकार असल्याने श्री. पियुष जितेंद्र परमार यांना स्वच्छता निरिक्षक या पदावर नियुक्ती देणेबाबत मान्यता घेणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांचे उचित निर्णयास्तव सादर करावे.अशी शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन )<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (मनोज घोडे पाटील )<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ७ | **श्रीम.लिला राजु रेवर**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्रीम.मनिषा राजेंद्र रेवर**<br>विवाहीत मुलगी<br>(नामनिर्देशीत वारस ) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये नामनिर्देशीत वारस म्हणून **श्रीम.मनिषा राजेंद्र रेवर, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ८ | **श्री.भाऊदास शंकर जाधव**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.केतन भाऊदास जाधव**<br>(मुलगा | श्री.केतन भाऊदास जाधव यांनी सादर केलेल्या दस्तांपैकी त्यांचे शाळा सोडल्याचा दाखला यावर त्यांचे वडीलांचे नाव भाऊदास ऐवजी भाऊसाहेब असे नमुद आहे. परंतु, शाळा सोडल्याच्या दाखल्यावर वडीलांचे नमुद नावाबाबत त्यांचे नांव बदलबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात दुरुस्ती केलेली असुन, भाऊदास हे नांव खरे असलेबाबत श्री.जाधव यांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र व इतर दस्तांवरुन श्री.केतन भाऊदास जाधव हे प्रचलीत नाव असलेबाबत खात्री होत आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.केतन भाऊदास जाधव, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ९ | **श्रीम.शारदा रमेश काळे**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्री.गौरव रमेश काळे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.गौरव रमेश काळे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १० | **श्री.नंदकुमार रघुनाथ शिंदे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.सनी नंदकुमार शिंदे**<br>(मुलगा) | **श्री. सनी नंदकुमार शिंदे,हे भटक्या जमाती** (NT-B) या संवार्गाचे असल्याने, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक :सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/ महामंडळे, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६ यातील तरतुदीस अनुसरून नसल्याने **श्री. सनी नंदकुमार शिंदे,** हे नियुक्तीस **अपात्र** होत असल्याची निवड समिती शिफारस करत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन )<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (मनोज घोडे पाटील )<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |



Scanned with CamScanner

**विषय क्र. ०२ - यापुर्वी निकाली काढणेत आलेल्या प्रकरणी पुन:र्जिवीत / पुन:र्विलोकनार्थ बाबत मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेले प्रकरणे ...**

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १. | कै.विक्रम राजेंद्र चव्हाण<br>मयत सफाई कामगार | श्रीम. रविना विक्रम चव्हाण (पत्नी) | श्री. विक्रम राजेंद्र चव्हाण स.कामगार यांचे दि. ०९.१०.२०१५ रोजी निधन झाल्याने लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काने त्यांचे रिक्तपदी त्यांची पत्नी श्रीम. रविना विक्रम चव्हाण यांनी दिनांक ३०.१२.२०१६ रोजी अर्ज सादर केला.सदरचे प्रकरण दि.०८.०३.२०१९ रोजीचे कर्मचारी निवड समिती समोर सादर केले असता, श्रीम. रविना चव्हाण यांनी नोकरीकरिता केलेला अर्ज २ महिने २१ दिवस उशीरा (विलंबाने) केल्याने त्यांचा अर्ज निकाली काढणेत आला.<br>श्रीम.रविना चव्हाण यांनी वेळोवेळी अर्ज सादर करुन सदरची बाब क्षमायाचीत करणेबाबत विनंती अर्ज दिल्याने लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काच्या नेमणुकीबाबत अंमलबजावणी करतांना पारीत झालेल्या दि. १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रकातील तरतुदींचा मा. आयुक्त महोदय यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारान्वये वारसाने केलेला नियुक्ती मिळणेबाबत अर्जाच्या विहीत मुदतीबाबत सेवाप्रवेश नियम शिथील करुन वापर करणेस मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.<br>तथापि, मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांचे मान्यतेनुसार सदर प्रकरणी कार्यवाही होणे क्रमप्राप्त असल्याने लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करतांना अंमलबजावणीबाबत निर्गमीत झालेले शासन निर्णय / परिपत्रक यातील तरतुदीनुसार श्रीम.रविना चव्हाण यांनी सादर केलेल्या दस्तांची पडताळणी केली असता, श्रीम.रविना विक्रम चव्हाण यांचे शाळा सोडलेच्या दाखल्यावर त्यांचे जातीचा उल्लेख् नमुद नाही. श्रीम. रविना चव्हाण यांचा जातीचा दाखला निदर्शनास येत नाही. शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ अन्वये अनुसुचित जाती हया संवर्गास लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काचा लाभ अनुज्ञेय असल्याने श्रीम. रविना चव्हाण यांनी जातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. तसेच, श्रीम.रविना विक्रम चव्हाण यांचे सद्यस्थितीतील चारित्र पडताळणी अहवाल, कुटुंबातील सदस्यांचे संमतीपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, कुटुंब पालन पोषणबाबत हमिपत्र इत्यादी तदअनुशंगीक कागदपत्र सादर करणेबाबत संचालक (घ.व्य.वि.) यांचेमार्फत संबंधितास कळविणेत यावे.<br>**उपरोक्त ~~समुक्त्री~~ पुर्तता ~~झालेनंतर~~ प्रस्तुत प्रकरणी कर्मचारी निवड समितीवर निर्णय घेता येईल असे निवड समितीचे मत आहे.** |

कागदपत्रांची केल्यानंतर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण) | (मनोज घोडे पाटील)<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) ८/७/२०२२ |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| २. | **श्रीम.सुनिता विजय पवार** स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.अजय विजय पवार** (मुलगा) | सदरचे प्रकरण दि.०४.०१.२०२२ रोजीच्या बैठकीसमोर सादर केले असता, श्री. अजय विजय पवार यांचे विरुध्द गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आल्याने श्री. अजय विजय पवार हे लाड कमिटी शिफारशीच्या नियमानुसार नियुक्तीस अपात्र होत असल्याने त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करता येत नसलेबाबत अर्ज निकाली काढणेत आला.<br>श्री. अजय विजय पवार यांनी त्यांचे विरुध्द गुरनं.४७१/२०१७ जुगार प्रतीबंधक कायदा कलम १२ (अ) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयातुन मा. न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली असलेबाबत मा. न्यायाधीश (अ.श देशमुख) २ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग कोर्ट नं.०२ नाशिक यांचा दि.१८.०१.२०२२ रोजी जारी केलेला अंतिम अहवाल आदेश सादर केल्याने सदरचे प्रकरण दिनांक ३१.०५.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समिती बैठकीसमोर सादर करणेत आले.यापुर्वी मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने व स्वाक्षरीने निकाली काढणेत आलेले प्रकरणांबाबत संबंधित अर्जदाराने सदर प्रकरणी पुन:विलोकनार्थ नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडेस अपिल दाखल करावे. असे कर्मचारी निवड समितीचे निर्देश दिले.त्यानुसार श्री. अज्य विजय पवार यांनी सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने प्रस्ताव सादर करणेत आला. मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी सदर प्रकरण पुन:जिवीत करुन पुढील कार्यवाहीस्तव कर्मचारी निवड समिती समोर सादर करणेस दि.२३.०६.२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.अजय विजय पवार, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

**विषय क्र. ०३ -** लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काची अंमलबजावणी करणेबाबत शासन निर्णय क्रमांक: सफाई -२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दिनांक ११ मार्च २०१६ चे शासन निर्णयामध्ये सफाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या अथवा सेवानिवृत्त घेणाऱ्या किंवा सेवेत असतांना निधन पावलेल्या अनुसुचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यास सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. असं स्पष्ट नमुद असल्याने अनुसुचित जाती व्यतीरीक्त इतर संवर्गातील प्राप्त झालेले प्रकरणे उक्त शासन निर्णयान्वये अपात्र ठरवून निकाली काढणेत येतात. त्यास्तव अनुसुचित जाती व्यतीरीक्त इतर संवर्गातील प्राप्त झालेले प्रकरणे यापुढे कर्मचारी निवड समिती समोर सादर न करता, संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, यांनी ~~यांचे स्तरावर दिनांक~~ ११ मार्च २०१६ चे शासन निर्णयाची उपरोक्त नमुदप्रमाणे अंमलबजावणी करुन संबंधितास कळविणेत यावे.अशी शिफारस करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत चर्चा करणेत आली. दिलेले निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत येऊन पुढील बैठकीत माहिती सादर करावी असे निर्देश समितीने दिले. तसेच, कर्मचारी निवड समितीची पुढील बैठकीचे नियोजन करणेत यावे असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड )<br>संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (नरेंद्र महाजन)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण)<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (मनोज घोडेपाटील)<br>उपआयुक्त (प्र.)<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त,सेवा<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक |

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक



Scanned with CamScanner